खडक पोलीस स्टेशन पुणे
दिनांक – ०७/११/२०१७

# प्रेसनोट

---

## सराईत गुन्हेगार इरफानँ ऊर्फ डंगाज खाजा शेख पुणे शहर व जिल्हयातुन दोन वर्षासाठी तडीपार

---

मा. रश्मी शुक्ला पोलीस आयुक्त पुणे शहर व मा. रविंद्र कदम पोलीस सह आयुक्त पुणे यांनी आगामी काळात पुणे शहरात मोठया प्रमाणात साजरा होणारे गणेशोत्सव व नवरात्र उत्सवाचे काळात कोणताही अनुचित प्रकार घडु नये व आपले गुन्हेगारी कृत्याने वर्चस्व निर्माण करणारे टोळींचा समुळ नायनाट करण्यासाठी व अशा गुन्हेगारांविरुध्द कडक व ठोस कारवाई करण्याबाबत पोलीस अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

खडक पोलीस स्टेशन पुणे चे अभिलेखावरील सराईत व अट्टल गुन्हेगार इरफान ऊर्फ डंगाज खाजा शेख वय – २३ रा – ८०३ राजीव गांधी कॉम्प्लेक्स कासेवाडी भवानी पेठ पुणे हा सन २००७ पासुन गुन्हेगार क्षेत्रात कार्यरत आहे त्याचेविरुध्द खडक पोलीस स्टेशन पुणे येथे पुणे शहरातील **वानवडी, स्वारगेट, समर्थ व इतर पोलीस स्टेशन येथे दिवसा व रात्रौ घरफोडी चोरी, इतर चोरी तसेच वाहन चोरी असे एकुण एकोणतीस गुन्हे दाखल आहेत.** त्यास यापुर्वी डिसेंबर सन २०११ मध्ये पुणे शहर व जिल्हयामधुन दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आले होते व सन २०१४ मध्ये त्याने कोणत्याही प्रकारे गुन्हेगारी कृत्य करु नये म्हणुन प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती परंतु त्याचे वागण्यामध्ये काहीही फरक पडलेला नव्हता.

नमुद सराईत गुन्हेगार **इरफान ऊर्फ डंगाज खाजा शेख** याचेविरुध्द वेळोवेळी कारवाई करुनही त्याचे वागणुकीत काहीएक फरक पडलेला नव्हता त्याने या भागात आपली भयंकर दहशत निर्माण केली होती त्याचे दहशतीमुळे व भितीपोटी त्याचेविरुध्द कोणीही तक्रार देण्यास पुढे येत नव्हते त्याचे अशा कृत्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे मनात भिती निर्माण होवुन त्याचे जिवितास व मालमत्तेस धोका निर्माण झाला होता त्याचे भिती पोटी व दहशतीमुळे त्याचेविरुध्द कोणी साक्ष देण्यास पुढे येत नव्हते. **त्यास पुणे शहर व जिल्हयामधुन हददपार करण्याबाबतचा प्रस्ताव डॉ. बसवराज तेली पोलीस उप आयुक्त परिमंडळ - १ पुणे शहर यांचेकडे पाठविण्यात आला होता. त्यानुसार त्यांनी त्यास पुणे शहर व पुणे जिल्हा कार्यक्षेत्रा मधुन ७ नोव्हेंबर २०१७ पासुन दोन वर्षाकरिता तडीपार केलेले आहे.**

अशाप्रकारे पोलीसांनी समाजकंटक सराईत व अटटल गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवले आहे व त्यांचेविरुध्द कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

शहर विभागाचे सहायक पोलीस आयुक्त श्री. बाजीराव मोहीत यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेन्द्र मोकाशी व श्री संभाजी शिर्के पोलीस निरीक्षक (गुन्हे) व पोलीस उप निरीक्षक आनंत व्यवहारे, संजय गायकवाड व पोलीस कर्मचारी सर्फराज शेख, महेश बारवकर, महेश कांबळे , समीर सावंत यांनी सदर कारवाई मध्ये भाग घेवुन प्रस्ताव तयार केलेला आहे.